# प्रेसनोट

दि. १८/०६/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणी पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | शरद भाऊसाहेब चेचरे, वय–४६ वर्ष, तलाठी बाभळेश्वर यांचे खाजगी मदतनीस, तलाठी कार्यालय बाभळेश्वर, ता.राहाता, जि.अहमदनगर रा.लोहगांव, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे वडीलांच्या नावे मौजे बाभळेश्वर खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर येथे गट क्र.७५/१८ मधील क्षेत्र २ आर व गट क्र.७५/२२ मधील क्षेत्र १ आर असे आहे. सदर प्लॉटचे दि.१३/०६/२०२४ रोजी तक्रारदार व त्यांच्या वडीलांच्या नावाने रक्कम रुपये १५,००,०००/– चे ए.यु. स्मॉल फायनान्स बॅंक लिमिटेड, शाखा अहमदनगर यांचे नावे दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडील दस्त क्र. ३६८४/२०२४ अन्वये गहाणखत केलेले आहे. सदर गहाण खताची नोंद तक्रारदार यांचे वडीलांचे नावे क्षेत्र असलेल्या सात बारा उता–यावर घेण्याकरीता बाभळेश्वर तलाठी कार्यालयातील काम करणारे चेचरे हे तलाठी बाभळेश्वर व स्वत: करीता लाचेची मागणी करत असले बाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगरकडे आज दि.१८/६/२०२४ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार आज दि.१८/०६/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली, पडताळणी दरम्यान तलाठी बाभळेश्वर यांचे खाजगी मदतनीस चेचरे यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचांसमक्ष तलाठी मंडलिक यांचेकरीता तसेच स्वत: करीता ५००/– रुपये लाचेची मागणी केली व सदर लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली. यशस्वी सापळा कारवाई दरम्यान सदरची लाच रक्कम तक्रारदार यांच्याकडून पंचांसमक्ष स्वीकारली असता आरोपी चेचरे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत तलाठी बाभळेश्वर यांचे खाजगी मदतनीस शरद भाऊसाहेब चेचरे यांचेविरुध्द लोणी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलचुपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर